रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886


विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597



https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282


# जालन्याच्या औद्योगिक विकासाला मिळणार नवी दिशा

## ३ सप्टेंबरला 'इंडस्ट्रियल समिट २०२६; ड्राय पोर्ट, निर्यात–आयात, नवीन गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीवर भर



### औद्योगिक विस्ताराला नवी संधी

- ड्रायपोर्ट DMIC जोडणीचा प्रयत्न: जालन्यातील ड्रायपोर्टला DMIC शी जोडण्यासाठी प्रयत्न सुरू असून, दोन्ही पायाभूत सुविधांमधील अंतर अवघे ३० किमी आहे.
- १,५०० ते २,००० एकर जागेची मागणी: MIDC च्या औद्योगिक विस्तारासाठी अतिरिक्त जागेची मागणी करण्यात आली आहे.
- १० हजारांहून अधिक रोजगार: प्रस्तावित विस्तारामुळे जालन्यात १० हजारांपेक्षा अधिक रोजगारनिर्मितीची क्षमता आहे.
- नवीन उद्योगांना निमंत्रण: महामार्ग, रेल्वे, ड्रायपोर्ट आणि औद्योगिक सुविधांमुळे जालना गुंतवणुकीसाठी अनुकूल ठिकाण ठरत आहे.
- फूड प्रोसेसिंगवर भर: कृषी उत्पादन, कच्चा माल आणि वाहतूक सुविधांचा लाभ घेत फूड प्रोसेसिंग उद्योगांनी जालन्यात गुंतवणूक करावी, असे आवाहन.

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला वेग देण्याबरोबरच जिल्ह्याला मराठवाड्यातील प्रमुख लॉजिस्टिक्स, मॅन्युफॅक्चरिंग आणि निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जालना फर्स्ट आणि जिल्हा प्रशासन, जालना यांच्या सहकार्याने इंडस्ट्रियल समिट २०२६'चे आयोजन ३ सप्टेंबर २०२६ रोजी हॉटेल सिद्धार्थ द फर्न, जालना येथे सकाळी ९ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत करण्यात आले आहे. जालन्यात नव्याने कार्यान्वित झालेल्या मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क (MMLP) अर्थात Dry Port चा स्थानिक उद्योगांना अधिकाधिक लाभ मिळवून देणे, जालन्यातून निर्यात-आयात वाढविणे, लॉजिस्टिक्सचा खर्च व वेळ कमी करणे, नवीन उद्योगांना आकर्षित करणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हे या समिटचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या समिटचे विशेष आकर्षण म्हणजे केंद्र व राज्य शासनातील औद्योगिक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती. जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणचे अध्यक्ष गौरव दयाल तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. जालन्याच्या Dry Port चा JNPA शी असलेला संबंध, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी कनेक्टिव्हिटी, निर्यात-आयातीच्या संधी, औद्योगिक गुंतवणूक आणि जालना परिसरातील आगामी विकासाच्या दृष्टीने या दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती महत्त्वाची मानली जात आहे.

याशिवाय छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, दक्षिण मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध नामांकित औद्योगिक समूहांचे प्रतिनिधी समिटमध्ये सहभागी होणार आहेत. जालना जिल्ह्याला स्टील, बियाणे, कृषी प्रक्रिया, अभियांत्रिकी आणि उत्पादन उद्योगांची भक्कम परंपरा आहे. या पारंपरिक औद्योगिक सामर्थ्याला आता समृद्धी महामार्ग, रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि नव्याने कार्यान्वित झालेल्या MMLP/Dry Port ची जोड मिळाली आहे. त्यामुळे जालना केवळ उत्पादन करणारा औद्योगिक जिल्हा न राहता उत्पादनाबरोबरच लॉजिस्टिक्स, कंटेनर वाहतूक, निर्यात-आयात आणि वेअरहाउसिंगचे केंद्र बनण्याची क्षमता बाळगतो. याच क्षमतेचा प्रभावी वापर कसा करता येईल, यावर समिटमध्ये सविस्तर चर्चा होणार आहे.

> 'जालना – The Gateway to Growth'(विकासाचे प्रवेशद्वार) या संकल्पनेला प्रत्यक्ष औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीची जोड देण्याच्या दृष्टीने ही समिट जालन्याच्या औद्योगिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

समिटमध्ये जालना MMLP/Dry Port वर स्वतंत्र की-नोट सत्र आणि पॅनेल चर्चा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये जालन्यातून थेट निर्यात-आयात वाढविण्याच्या संधी, कंटेनर व मल्टी-मोडल कार्गो वाहतूक, JNPA तसेच देश-विदेशातील बाजारपेठांशी कनेक्टिव्हिटी या विषयांवर विचारमंथन होणार आहे.

याशिवाय उद्योगांचा लॉजिस्टिक्स खर्च आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी MMLPचा कसा वापर करता येईल, वेअरहाउसिंग, फ्रेट, कंटेनर, ट्रान्सपोर्ट आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात कोणत्या नव्या व्यवसायसंधी निर्माण होऊ शकतात, यावरही चर्चा होणार आहे.

स्थानिक उद्योगांनी Dry Port चा जास्तीत जास्त वापर कसा करावा, रेल्वे मालवाहतुकीचा विस्तार कसा होऊ शकतो आणि जालन्याला भविष्यात मराठवाड्याचे प्रमुख लॉजिस्टिक्स व निर्यात केंद्र कसे बनवता येईल, *(पान २ वर)*

### जिल्हाधिकाऱ्यांची एनओसी मिळाली; जालना शहरातील 'भीम पार्क'चा मार्ग मोकळा

# विकासकामांची कार्यान्वयन एजन्सी मनपाच असावी – कैलास गोरंट्याल



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मोतीबाग तलाव परिसरात प्रस्तावित असलेल्या विपश्यना केंद्र तथा 'भीम पार्क'च्या उभारणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली नाहरकत प्रमाणपत्राची () प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पूर्ण करण्यात आली असून, जालना महानगरपालिकेला सदर जागेचा प्रस्तावित प्रकल्पासाठी अधिकृत वापर करण्यास हरकत नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी काळात महानगरपालिकेच्या पातळीवर आवश्यक ठराव व पुढील प्रशासकीय प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

ही माहिती जालन्याचे माजी आमदार तथा भाजप नेते कैलास गोरंट्याल यांनी शुक्रवारी जालना शहरातील आझाद मैदान परिसरातील एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली. मोतीबाग तलावातील प्रस्तावित भीम पार्कबाबत यापूर्वी निर्माण झालेला कायदेशीर व प्रशासकीय पेच जिल्हाधिकाऱ्यांच्या एनओसीमुळे दूर झाला असल्याचा दावा त्यांनी केला.

मोतीबाग तलावाची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असली तरी संबंधित जमिनीचा सातबारा उतारा महाराष्ट्र शासनाच्या नावावर असल्याने महानगरपालिकेला थेट प्रकल्पाचा ठराव करता येईल का, असा प्रश्न यापूर्वी उपस्थित झाला होता. याच मुद्द्यावरून भीम पार्कच्या प्रस्तावाबाबत प्रशासकीय प्रक्रिया रखडल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले. गोरंट्याल यांच्या म्हणण्यानुसार, सर्व्हे क्रमांक ५०६ मधील ८१.२७ हेक्टर जमीन ३१ ऑक्टोबर १९९० रोजी तत्कालीन नगर परिषदेकडे ताब्यात देण्यात आली होती. मात्र सातबारा उताऱ्यावर मालकी हक्काची नोंद अद्याप महानगरपालिकेच्या नावावर झालेली नसल्याने प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका महत्त्वाची ठरत होती.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर *(पान २ वर)*

### पोलीस प्रशिक्षण केंद्रात जलसंधारण कार्याला प्रारंभ

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शुभारंभ; २५ जलशोषक खड्डे व ५० ट्रेन्च–कम–बंड्सची निर्मिती

**जालना - प्रतिनिधी**

पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्याच्या उद्देशाने पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे जलसंधारणाच्या कामाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनातून जिल्हाभरात जलसंधारणाच्या कामांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळत आहे. त्याला प्रतिसाद देत पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर यांच्या नेतृत्वाखाली आणि भूजल तज्ज्ञ डॉ. पंडित वासरे (कृषी विज्ञान केंद्र, जालना) यांच्या मार्गदर्शनातून हे काम हाती घेण्यात आले आहे. पोलीस प्रशिक्षणार्थींच्या श्रमदानासह कुंडलिका-सीना फाऊंडेशनच्या संयुक्त सहभागातून प्रशिक्षण केंद्र परिसरात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांवर ट्रेन्च-कम-बंड्स, तसेच पाण्याच्या प्रवाह क्षेत्रात मोठे जलशोषक खड्डे तयार करण्यात येत आहेत. कामाच्या शुभारंभाच्या वेळी १० जलशोषक खड्डे आणि २० ट्रेन्च-कम-बंड्स तयार करण्यात आले. संपूर्ण प्रशिक्षण केंद्र परिसरात एकूण २५ जलशोषक खड्डे आणि ५० ट्रेन्च-कम-बंड्स तयार करण्यात येणार आहेत.

या जलसंधारण उपाययोजनांमुळे पावसाचे वाहून जाणारे लाखो लिटर पाणी परिसरातच अडवून जमिनीत मुरविणे शक्य होणार आहे. *(पान २ वर)*

# सळई, सेट्रींग प्लेट व लोखंडी पाईप चोरीप्रकरणी दोघे जेरबंद; ३.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

### चोरीचा माल विकत घेणाऱ्यालाही अटक, टाटा एस वाहनासह साहित्य ताब्यात



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर व परिसरात बांधकाम साहित्याची चोरी करणाऱ्या टोळीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत दोन आरोपींना जेरबंद केले आहे. लोखंडी सळईचे बंडल, सेट्रींग प्लेट व बांधकामासाठी वापरण्यात येणारे लोखंडी पाईप चोरी करून ते भंगार व्यावसायिकाला विक्री करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीचा माल विकत घेणाऱ्या दुसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात आली असून, टाटा एस वाहनासह एकूण ३ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी जालना जिल्ह्यातील चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथक तयार करून आरोपींचा शोध घेण्यासाठी कारवाई सुरू केली.

या तपासादरम्यान पोलिसांसमोर दोन चोरीचे गुन्हे होते. पहिल्या प्रकरणात शकुंतला नगर, जालना येथील महार्सीग गंगाअप्पा मिटकरी (वय ५५) यांनी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. २९ जुलै २०२६ रोजी मंठा रोडवरील जनार्धन सिमेंट प्रोडक्ट, राममूर्ती शिवारातील त्यांच्या प्लॉटमधून अज्ञात चोरट्यांनी १२ हजार रुपये किमतीचे लोखंडी सळईचे तीन बंडल चोरून नेले होते. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०८/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दुसऱ्या घटनेत ठेकेदार यासिन हमीद परसुवाले (वय २९, रा. बुऱ्हाणनगर, जालना) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास बुऱ्हाणनगर येथील बिलाल मुन्नीवाले *(पान २ वर)*

# गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलता,पीडितांबाबत संवेदनशीलता प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असावे – विजया रहाटकर

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या 'शक्ती व सुरक्षा' कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा विषय नसून, सुशासनाचा महत्त्वाचा निकष आहे. पीडित महिलेचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता शांतपणे ऐकावे आणि तिच्या सन्मानाची काळजी घ्यावी. गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना पीडितांबाबत कमाल संवेदनशीलता राखणे, हे प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.



राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र पोलिसांच्या वतीने आयोजित 'शक्ती व सुरक्षा' कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती साधना जाधव, राज्याच्या महिला गुन्हे प्रतिबंधक विभागाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह व समन्वयक सर्वेश पांडे आदी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, केवळ तक्रार स्वीकारून किंवा एफआयआर नोंदवून पोलिसांचे कर्तव्य संपत नाही. पीडित महिलेला वन स्टॉप सेंटर, संरक्षण अधिकारी व मोफत कायदेशीर मदतीची माहिती देऊन संबंधित यंत्रणांशी जोडून द्यावे. पोलीस, संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग आणि इतर यंत्रणांमध्ये समन्वय वाढवावा. त्या पुढे म्हणाल्या की, तक्रारदार महिलेबाबत कोणताही पूर्वग्रह ठेवू नये. तिला पुरेसा वेळ देऊन तिचे म्हणणे मध्येच न तोडता ऐकून घ्यावे. आघातामुळे घटनेचा क्रम सांगताना पीडितेला अडचण येऊ शकते. त्यामुळे घाईघाईने निष्कर्ष काढू नयेत. सन्मानपूर्वक वागणुकीतून तिचा पोलिसांवरील विश्वास वाढतो. बदलत्या काळानुसार गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होणारी फसवणूक, बनावट चित्रफिती आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञान, माहिती आणि वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणेही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक तक्रार गांभीर्याने घेऊन तपास निष्पक्षपणे व वेळेत पूर्ण करावा. 'सुरक्षित महिला म्हणजे सक्षम समाज आणि सक्षम समाज म्हणजे सक्षम राष्ट्र,' हे सूत्र लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे. महाराष्ट्र पोलीस महिलांना न्याय देण्यासाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री. जैन म्हणाले की, पीडित महिला पोलीस ठाण्यात येते तेव्हा पोलीस हे तिच्यासाठी सरकारचे पहिले द्वार असतात. त्यामुळे *(पान २ वर)*

पान १ व ४ वरुन...

## जालन्याच्या औद्योगिक...

या मुद्द्यांनाही समिटमध्ये प्राधान्य दिले जाणार आहे.

समिटचा दुसरा महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे नवीन औद्योगिक गुंतवणूक. जालना आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर नवीन उद्योग आकर्षित करण्यासाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा आणि औद्योगिक परिसंस्थेची माहिती संभाव्य गुंतवणूकदारांसमोर मांडली जाणार आहे. विशेषतः स्टील व स्टील ॲन्सिलरीज, ऑटोमोबाईल व ऑटो ॲन्सिलरीज, अभियांत्रिकी, कृषी प्रक्रिया, बियाणे, सिल्क, ऊर्जा, लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग आणि विविध उत्पादन क्षेत्रांतील उद्योगांसाठी जालन्यातील संधी अधोरेखित केल्या जाणार आहेत. उद्योगांसाठी उपलब्ध जमीन, मनुष्यबळ, बाजारपेठेची जवळीक, समृद्धी महामार्गाची जोडणी, रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि Dry Port या सर्व घटकांमुळे जालन्यात गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. या संधींचे प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतर करण्याचे आव्हान समिटसमोर असेल.

औद्योगिक गुंतवणूक करताना उद्योजकांना भेडसावणारे जमीन, पाणी, वीज, रस्ते, रेल्वे, लॉजिस्टिक्स, MIDC च्या सुविधा, निर्यात प्रक्रिया आणि विविध प्रशासकीय बाबींचे प्रश्न वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर थेट मांडण्याची संधी समिटमध्ये मिळणार आहे.

त्यामुळे हा कार्यक्रम केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता उद्योगांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर पुढील कृतीची दिशा निश्चित करण्यासाठीचे व्यासपीठ ठरण्याची अपेक्षा आहे. 'इंडस्ट्रियल समिट २०२६'मध्ये उद्योगजगत, शासनाच्या विविध संस्था, निर्यातदार, आयातदार, लॉजिस्टिक्स कंपन्या स्टार्टअप्स, MSMEs वित्तीय संस्था, संभाव्य गुंतवणूकदार आणि औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

समिटमध्ये MMLP वरील की-नोट,MMLP वरील पॅनेल चर्चा,JNPA चे विशेष संबोधन, MIDC CEO चे मार्गदर्शन, नवीन औद्योगिक गुंतवणुकीवरील की-नोट व पॅनेल चर्चा, उद्योग क्षेत्रावरील विशेष सत्र, भविष्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटीवरील संबोधन आणि प्रश्नोत्तर सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

समिटचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमानंतर सहभागी प्रतिनिधींसाठी जालना MMLP/Dry Port ची विशेष भेट आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे उद्योजक आणि गुंतवणूकदारांना या पायाभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करता येणार असून, त्यांच्या उद्योगांसाठी त्याचा वापर कसा करता येईल, याची अधिक स्पष्ट कल्पना मिळणार आहे. या समिटला Vikas Group of Companies चे Lead Sponsor म्हणून सहकार्य लाभले आहे. जालना MMLP/Dry Port च्या कार्यान्वयनाशी या समूहाचा थेट संबंध असल्याने उद्योग आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राचा व्यावहारिक दृष्टिकोन समिटला मिळणार आहे.

पारंपरिक औद्योगिक क्षेत्रांमध्ये भक्कम स्थान निर्माण केलेल्या जालन्यापुढे आता औद्योगिक विकासाचा पुढील टप्पा गाठण्याची संधी आहे. स्टील, बियाणे, कृषी प्रक्रिया आणि अभियांत्रिकी उद्योगांची ताकद, त्याला मिळालेली समृद्धी महामार्गाची जोड, रेल्वे वाहतूक आणि आता MMLP/Dry Port ची सुविधा या सर्वांचा एकत्रित वापर झाल्यास जालना महाराष्ट्रातील महत्त्वाचे मॅन्युफॅक्चरिंग, लॉजिस्टिक्स आणि निर्यात केंद्र म्हणून पुढे येऊ शकते. याच उद्देशाने उद्योग, शासन, लॉजिस्टिक्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सर्व घटकांना एकाच व्यासपीठावर आणून प्रत्यक्ष गुंतवणूक, व्यापारवाढ आणि रोजगारनिर्मितीचा रोडमॅप तयार करण्याचा प्रयत्न 'इंडस्ट्रियल समिट २०२६'च्या माध्यमातून केला जाणार आहे.

जालना व मराठवाड्यातील उद्योगपती, निर्यातदार, आयातदार, उद्योजक, , स्टार्टअप्स, लॉजिस्टिक्स सेवा प्रदाते, ट्रान्सपोर्टर्स, वेअरहाउसिंग कंपन्या, गुंतवणूकदार तसेच औद्योगिक विकासाशी संबंधित सर्व घटकांनी या समिटमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक जालना फर्स्ट आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. नोंदणी https://register.jalnafirst.in/ येथे करता येईल.

## जिल्हाधिकाऱ्यांची...

महानगरपालिकेच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे एनओसीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. आता जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर जमिनीबाबत महानगरपालिकेच्या नावाची नोंद घेण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे स्पष्ट करत, प्रकल्पासाठी जमिनीचा अधिकृत वापर करण्यास हरकत नसल्याचे कळविल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले.

मोतीबाग तलाव परिसरात विपश्यना केंद्र, तथागत भगवान गौतम बुद्ध यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच परिसरातील विविध अनुषंगिक विकासकामे करण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रकल्प केवळ पुतळा उभारण्यापुरता मर्यादित न राहता नागरिकांसाठी एक महत्त्वाचे सार्वजनिक व सामाजिक केंद्र म्हणून विकसित करण्याचा मानस असल्याचे सांगण्यात आले.

एनओसी मिळाल्यानंतर आता महानगरपालिकेच्या आगामी बैठकीत या विषयावर ठराव मांडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा ठराव काही अटींसह करण्याचा विचार असल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले.

**'कामाची एजन्सी महानगरपालिकाच असावी'**

भीम पार्कच्या विकासकामांची कार्यन्वयन एजन्सी जालना महानगरपालिकाच असावी, ही आपली प्रमुख भूमिका असल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले.

बाहेरील यंत्रणेमार्फत विकासकामे करून प्रकल्प महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यानंतर त्याच्या देखभाल-दुरुस्तीचा आर्थिक भार मनपावर येतो. त्यामुळे प्रकल्पाची उभारणी, देखभाल आणि व्यवस्थापन यामध्ये सुरुवातीपासूनच महानगरपालिकेचा थेट सहभाग असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यासंदर्भात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याशी चर्चा झाल्याचेही त्यांनी नमूद केले. आगामी काळात महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे आणि आपण स्वतः मंत्री शिरसाट यांची भेट घेऊन भीम पार्कच्या कामाची कार्यान्वयन एजन्सी महानगरपालिकेला देण्याची मागणी करणार असल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले. भीम पार्क उभारल्यानंतर त्याची देखभाल, सुरक्षा, स्वच्छता, उद्यान व्यवस्थापन, प्रकाश व्यवस्था तसेच परिसरातील नागरी सुविधा यांची जबाबदारी कोणाची राहणार, हा प्रश्न भविष्यात महत्त्वाचा ठरणार आहे. प्रकल्पाची मालकी व वापराचा अधिकार महानगरपालिकेकडे येणार असल्यास त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद आणि मनुष्यबळाची उपलब्धता करणेही गरजेचे आहे.

याच पार्श्वभूमीवर गोरंट्याल यांनी महानगरपालिकेतील मनुष्यबळाच्या प्रश्नाकडेही लक्ष वेधले. महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये आवश्यकतेच्या तुलनेत कर्मचारी कमी असल्याने नागरी सेवा प्रभावीपणे देण्यावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः स्वच्छता, लिपिकीय कामकाज, शिपाई, उद्यान, नाट्यगृह आणि अन्य विभागांमध्ये मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार, वाढत्या नागरी सुविधा आणि नव्याने विकसित होणाऱ्या प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर केवळ नवीन मालमत्ता निर्माण करणे पुरेसे नसून त्यासाठी आवश्यक कर्मचारी व प्रशासकीय यंत्रणाही सक्षम करणे आवश्यक आहे. भीम पार्कसारख्या मोठ्या प्रकल्पाची उभारणी झाल्यानंतर त्याच्या व्यवस्थापनासाठीही मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ असणे आवश्यक ठरणार आहे.

पत्रकार परिषदेत गोरंट्याल यांनी जालना महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचाही मुद्दा उपस्थित केला. जालना शहरातून शासनाला मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असून, त्या तुलनेत महानगरपालिकेला मिळणारे अनुदान अपुरे असल्याचा दावा त्यांनी केला.

जालना हे स्टील, सिड्स आणि अन्य औद्योगिक क्षेत्रांसाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. शहरातून मोठ्या प्रमाणात कर शासनाकडे जमा होत असल्याने त्या तुलनेत महानगरपालिकेला अधिक आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जालना महानगरपालिकेला सध्या मिळणाऱ्या अनुदानात वाढ करून दरमहा किमान २० कोटी रुपये अनुदान मिळावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आल्याचे गोरंट्याल यांनी सांगितले. याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावाही त्यांनी केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एनओसी मिळाल्याने भीम पार्कच्या प्रस्तावातील एक महत्त्वाचा प्रशासकीय अडथळा दूर झाला आहे. मात्र, त्यानंतर महानगरपालिकेचा ठराव, प्रकल्पाचा आराखडा, निधीची उपलब्धता, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी, कार्यान्वयन यंत्रणा आणि भविष्यातील देखभाल यांसारख्या अनेक बाबींची पूर्तता करावी लागणार आहे. त्यामुळे एनओसी मिळणे हा प्रकल्पाचा अंतिम टप्पा नसून पुढील प्रक्रियेची सुरुवात आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आता महानगरपालिका प्रशासन आणि राज्य शासनाच्या संबंधित विभागांकडून पुढील निर्णय किती वेगाने घेतले जातात, यावर भीम पार्कच्या प्रत्यक्ष उभारणीची दिशा स्पष्ट होणार आहे.

पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नगरसेवक महावीर ढक्का, आलमखान पठाण, रमेश गौरक्षक, संजय भगत, विनोद यादव, सय्यद अझहर, संजय पाखरे, चेतन खंडेलवाल, संदीप नाईकवाडे, गोपाल चित्राल, बापू साळवे, दत्ता पाटील आदी उपस्थित होते.

## पोलीस प्रशिक्षण...

परिणामी भूजल पुनर्भरणास चालना मिळून परिसरातील भूजल पातळी उंचावण्यास मदत होणार आहे. समस्त महाजन संस्थेच्या विश्वस्त नूतन देसाई यांच्या माध्यमातून पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरात यापूर्वीही पाणलोट विकासाची विविध कामे करण्यात आली आहेत. यामध्ये पाझर तलाव, विहिरी तसेच कम्पार्टमेंट बंडिंगच्या कामांचा समावेश आहे. या कामांमुळे परिसरातील नागरी वसाहतींनाही त्याचे सकारात्मक परिणाम मिळत आहेत. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे आरपीआय केशव गिरडकर, कुंडलिका-सीना फाऊंडेशनचे उदय शिंदे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. विठ्ठल राजकर, समस्त महाजन संस्थेचे अरविंद नाईकनवरे तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ''पावसाचा प्रत्येक थेंब वाहून न जाता जमिनीत मुरला पाहिजे,'' या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरात जलसंधारणाची भक्कम पायाभरणी होणार असून, भविष्यात भूजल पातळी वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## सळई, सेट्रींग प्लेट...

यांच्या खाली प्लॉटमधून अज्ञात चोरट्यांनी ६० हजार रुपये किमतीच्या १२० सेट्रींग प्लेट आणि २० हजार रुपये किमतीचे २० लोखंडी बांधकाम पाईप चोरून नेले होते. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६६६/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू असताना २२ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला महत्त्वाची माहिती मिळाली. सराईत आरोपी ज्वालासिंग रामसिंग कलाणी (वय ४५, रा. गुरुगोविंदसिंगनगर, जालना) याने काही दिवसांपूर्वी लोखंडी सळईचे बंडल, सेट्रींग प्लेट व लोखंडी पाईप एमआयडीसी परिसरातील एका भंगार दुकानदाराला विकल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी ज्वालासिंग कलाणी याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरी केलेला माल गणेश नारायण कोल्हे (वय ३०, रा. शिवाजी नगर, म्हाडा कॉलनी, जालना) याला विकल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी गणेश कोल्हे यालाही ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीच्या मालासह वाहतुकीसाठी वापरलेले टाटा एस वाहन जप्त करण्यात आले.

स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३ लाख रुपये किमतीचे टाटा एस वाहन क्रमांक -२१--२३७९, १२ हजार रुपये किमतीचे लोखंडी सळईचे तीन बंडल, १६ हजार रुपये किमतीच्या ३२ लोखंडी सेट्रींग प्लेट, २० हजार रुपये किमतीचे २० बांधकामाचे लोखंडी पाईप अशा प्रकारे पोलिसांनी एकूण ३ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बांधकाम क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या लोखंडी साहित्याची चोरी करून ते भंगार बाजारात विक्री करण्याचा प्रकार या कारवाईतून समोर आला आहे. विशेष म्हणजे, चोरी करणाऱ्या आरोपीसोबतच चोरीचा माल खरेदी करणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोलिसांनी तपासाची दिशा नेली आहे. त्यामुळे शहर व औद्योगिक परिसरातील भंगार व्यावसायिकांकडून चोरीचा माल खरेदी केला जातो का, याचीही पोलिसांकडून पडताळणी होण्याची शक्यता आहे. या आरोपींनी यापूर्वी अशाच प्रकारच्या आणखी चोरीच्या घटना केल्या आहेत का, तसेच चोरीच्या मालाची विक्री आणखी कोणाकडे केली आहे का, याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, इरशाद पटेल, कैलास खाडे, रमेश काळे, योगेश सहाने, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर आणि अशोक जाधवर यांनी ही कारवाई केली. चोरीच्या बांधकाम साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मार्गाचा शोध लागल्याने, या प्रकरणाच्या तपासातून आणखी काही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## गुन्ह्यांबाबत शून्य...

महिलांचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता संवेदनशीलतेने ऐकावे. तक्रारीस विलंब झाला म्हणून प्रश्न उपस्थित करू नयेत आणि बळजबरीने तडजोड करण्याचा प्रयत्न करू नये.

प्रत्येक प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करून कायदेशीर कर्तव्य पार पाडावे. त्याचबरोबर पीडितेचा सन्मान राखून तिला आवश्यक आधार द्यावा. पोलिसांची संवेदनशील वागणूक पीडितेच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम करू शकते. महिलांच्या सन्मानाची व सुरक्षेची संस्कृती पुढे नेणे आवश्यक आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी खंबीरपणे कर्तव्य बजावताना संवेदनशीलताही जपावी. संवेदनशीलता ही प्रभावी व व्यावसायिक पोलीसिंगची ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. पवार म्हणाले की, डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांचा प्रभावी तपास करण्यासाठी पोलिसांची तांत्रिक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी तपासाच्या आधुनिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांच्या पीडितांना तातडीने मदत मिळण्यासाठी सक्षम आणि तत्पर प्रतिसाद व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. सायबर गुन्ह्यांचा तपास करताना तांत्रिक कौशल्याबरोबरच पीडितांशी संवेदनशीलतेने संवाद साधणे महत्त्वाचे आहे. पीडितांना योग्य आधार देऊन त्यांच्या गरजा समजून घेणारी पीडित-केंद्रित कार्यपद्धती पोलिसांनी स्वीकारावी. यामुळे पोलीस व्यवस्था अधिक जबाबदार, व्यावसायिक व नागरिकाभिमुख होण्यास मदत होईल. या प्रशिक्षणातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व संवेदनशील पोलीसिंग अधिक सक्षम होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविकात श्रीमती राऊत म्हणाल्या की, या कार्यशाळेचा मुख्य उद्देश वाढत्या सायबर गुन्ह्यांचा प्रभावी तांत्रिक तपास व दोषसिद्धीचे प्रमाण वाढविणे हा आहे. तसेच, पोलिसांमध्ये पीडित-केंद्रित संवेदनशील दृष्टिकोन रुजवून सक्षम आणि तत्पर प्रतिसाद प्रणाली निर्माण करणे, यावर या उपक्रमांतर्गत विशेष भर देण्यात आला आहे. या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर (शहर आणि ग्रामीण), जालना, धाराशिव, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर आणि रेल्वे पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा आणि महिला मदत कक्षातील (भरोसा सेल) १५० पोलीस अधिकारी आणि २०० पोलीस अंमलदार या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.

## श्रीराम वाचनालय...

महत्त्व विशद केले. संस्कृत भाषा शिकल्यामुळे बोलण्याची पद्धत सुधारते आणि भाषाशुद्धी होते. संस्कृतच्या अध्ययनामुळे इतर भाषाही आत्मसात करण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. संस्कृत दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धा उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. संस्कृत ही अत्यंत शास्त्रीय आणि विविध अंगांनी उपयुक्त भाषा असून तिच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास हातभार लागतो. विद्यार्थ्यांनी संस्कृतकडे केवळ गुण मिळविण्याचा विषय म्हणून न पाहता ती भाषा समजून घेऊन शिकावी, असे आवाहन त्यांनी केले. संस्कृत भाषेच्या अध्ययनामुळे आत्मविश्वास वाढतो, सभाधिटपणा येतो, बुद्धी तल्लख होते आणि बोलताना अडखळण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते, असेही त्यांनी नमूद केले. आपल्या शालेय जीवनातील संस्कृत विषयाच्या आठवणी सांगताना संस्कृतमुळे अभ्यासात चांगली कामगिरी करता आल्याचे त्यांनी सांगितले. संगणकाच्या दृष्टीनेही संस्कृत भाषेचे महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. राहुल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कष्ट, सातत्य आणि अभ्यासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी जीवनात मोठे ध्येय गाठावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी पालकांनीही त्यांना योग्य दिशा व प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीराम वाचनालयाशी असलेल्या आपल्या नात्याचा उल्लेख करताना चव्हाण म्हणाले की, आपण या वाचनालयाचे वाचक असून लेखनाची प्रेरणाही श्रीराम वाचनालयाच्या माध्यमातून मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात वाचनालयाचे महत्त्व मोठे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**अकरा विद्यार्थ्यांचा गौरव**

१९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या इयत्ता पाचवी व सहावीच्या संस्कृत स्पर्धेत सहभागी झालेल्या ११ विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला शैक्षणिक वातावरण लाभले. संस्कृत विषयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कीर्ती शेलगावकर यांनी मानले.

यावेळी हरेश शेलगावकर, प्रणव किनगावकर, सचिन महाजन, योगेश देवावाले, प्रमोद बागडी, सूर्यकांत रत्नपारखे, प्रसाद मगरे, पांडुरंग वाजे, पद्मिनी सुरंगीळीकर, शैलेंद्र बदनापूरकर यांच्यासह विद्यार्थी, पालक, संस्कृत शिक्षक आणि वाचकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## कचरा व्यवस्थापनात...

यादी तयार करून जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष कक्षाकडे सादर करावी लागेल. जे उत्पादक नियमांचे पालन करणार नाहीत, त्यांचे वीज व पाणी कनेक्शन खंडित करण्याचे अधिकार प्रशासनाकडे आल्यामुळे शहरातील मोकळ्या जागांवर कचरा टाकण्याच्या आणि कुंडलिका नदीकाठच्या प्रदूषण समस्येला आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार आहे. कचरा व्यवस्थापन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संविधानाच्या कलम ५१ए(जी) नुसार प्रत्येक नागरिकाचे ते मूलभूत कर्तव्य आहे. जालना शहरातील सर्व व्यावसायिक आणि मोठ्या आस्थापनांनी कचरा निर्मितीच्या जागीच त्याचे वर्गीकरण आणि शास्त्रोक्त विल्हेवाट लावली नाही, तर होणारी दंडात्मक कारवाई योग्यच ठरेल. स्थानिक प्रशासनाने या आदेशाची कठोर अंमलबजावणी करावी आणि नागरिकांनी स्वयंशिस्त पाळून कचरा व्यवस्थापनात सक्रिय सहभाग नोंदवावा, हीच काळाची गरज आहे.

## चार घरफोडींचा...

नमूद केले आहे. गुन्हा क्र. २०४/२०२६, कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बीएनएस, गुन्हा क्र. ४४१/२०२६, कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बीएनएस,गुन्हा क्र. ४३४/२०२६, कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बीएनएस, गुन्हा क्र. ३२७/२०२६, कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बीएनएस आरोपीला अधिक विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने मंठा चौफुली परिसरातून आकाशी रंगाची शाईन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्या ताब्यातून ही मोटारसायकल जप्त करण्यात आली. या दुचाकी चोरीप्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ४१८/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

पोलिसांनी आरोपीकडून घरफोडीच्या गुन्ह्यांसाठी वापरल्याचे सांगितले जाणारे साहित्यही जप्त केले आहे. त्यामध्ये नेव्ही ब्लू रंगाची शाईन मोटारसायकल, लाल रंगाची ड्रिम निओ मोटारसायकल, धारदार तलवार, लोखंडी कटर, ग्लायंडर मशीन आणि इलेक्ट्रिक कटर मशीन यांचा समावेश आहे. चोरीची मोटारसायकल व घरफोडीच्या साधनांसह जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ६७ हजार ६०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी हा सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चार घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये फरार होता. त्याच्याकडून चोरीची दुचाकी तसेच घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त झाल्याने, त्याने यापूर्वी आणखी काही घरफोड्या किंवा चोरीचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

विशेषतः चोरीच्या दुचाकींचा वापर घरफोड्यांसाठी केला जात होता का आणि जप्त केलेल्या वाहनांचा अन्य गुन्ह्यांशी संबंध आहे का, याचीही चौकशी होण्याची शक्यता आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप, पोहेकॉ जगन्नाथ कानडजे, तानाजी कानुरे, जगनाथ जाधव, पोलीस कॉन्स्टेबल भगवान मुंजाळ, दुर्गेश गोफणे, अजीम शेख, राहुल कटकम, संदीप गोतीस, धनाजी लोंढे तसेच महिला पोलीस हवालदार मगरे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## सुवर्णकार नगरात...

गणेश उदावंत, योगेश दुसाने, शाम कुलथे, राम उदावंत, विलास मैड, सुनीता ताई कुलथे, पूनम ताई खर्डेकर, महादणी ताई, दिशीत महाराज, पूजा ताई मैड, आशिष नगरकर, संजय शहाणे, कल्याण टेहरे, राम शहाणे आणि संपत सिंगारे यांच्यासह समाजबांधवांनी जयंती सोहळ्यात सहभाग घेतला.

महिला व युवकांचा सहभागही लक्षणीय होता. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत संत नरहरी महाराजांच्या विचारांना अभिवादन केले.

संत नरहरी महाराजांनी समाजाला दिलेला भक्ती, कष्ट, प्रामाणिकपणा आणि एकोप्याचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा आहे. त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थित समाजबांधवांनी व्यक्त केले.

समाजातील युवकांनी शिक्षण, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करताना आपल्या संतपरंपरेचा वारसा जपावा, तसेच समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात द्यावा, असा संदेशही जयंतीच्या निमित्ताने देण्यात आला.

संत नरहरी महाराज जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजातील बांधवांना एकत्र आणणारा आणि सामाजिक एकोपा दृढ करणारा दिवस असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन पुढील काळात सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्याची गरजही उपस्थितांनी व्यक्त केली. संत नरहरी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे सुवर्णकार नगर परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित समाजबांधवांनी संत नरहरी महाराजांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार केला.

## खासदार डॉ. कल्याण...

पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी बूथ पातळीपासून नियोजन करण्यावरही बैठकीत भर दिला जाण्याची शक्यता आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थितीचे आवाहन अंबड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण तारडे आणि अंबड शहर काँग्रेस अध्यक्ष जाकीर भाई डावरगावकर यांनी शहर व तालुक्यातील सर्व काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ अध्यक्ष तसेच प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीस आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. आपल्या गावातील किंवा परिसरातील जनतेच्या समस्या आणि विकासकामांशी संबंधित महत्त्वाचे विषय बैठकीत मांडता यावेत, यासाठी कार्यकर्त्यांनी संबंधित प्रश्नांची माहिती घेऊन बैठकीस उपस्थित राहावे, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.


## एकल महिलांच्या...

कार्यक्षेत्रातील एकल महिलांची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांच्या दि. १० ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्राद्वारे महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून नोंदणी व अद्ययावत माहिती संकलित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्वेक्षणामध्ये एकल महिलेचे नाव, एकल महिलेचा प्रकार, वय, संपूर्ण पत्ता, आधार क्रमांक, शिक्षण, उदरनिर्वाहाचे साधन, मासिक उत्पन्न, दिव्यांगत्व, कुटुंबातील सदस्यांची संख्या, दारिद्र्यरेषेखालील स्थिती, बचत गटातील सदस्यत्व तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे किंवा नाही आणि लाभ घेतलेल्या योजनांची माहिती संकलित करणे अपेक्षित आहे. या माहितीच्या आधारे एकल महिलांसाठीच्या विविध सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता येणार असून, पात्र महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन करणे शक्य होणार आहे. याच पार्श्वभूमीवर प्रा. सिद्धार्थ पानवले यांनी परतूर नगरपरिषद प्रशासनाकडे एकल महिलांचे सर्वेक्षण तातडीने करून त्यांची नोंदणी व अद्ययावत माहिती संकलित करण्याची मागणी केली. दरम्यान, उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून संबंधित अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा करण्यात आली. निवेदनाची दखल घेत संबंधित कार्यवाहीबाबत तातडीने निर्देश देण्यात आले आहेत. परतूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. मुख्याधिकाऱ्यांनी निवेदनातील मागणीची तात्काळ दखल घेत दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी पत्र काढून संबंधित यंत्रणेला सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत. शासनाच्या निर्देशानुसार एकल महिलांची अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध झाल्यास त्यांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी आवश्यक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता येईल,असा विश्वास प्रा. सिद्धार्थ पानवले यांनी व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# माझा आजन्म कारावास आणि गोताळा हत्याकांड

नुकतेच गोताळा हत्याकांड आणि त्याच गोताळा गावचे समाजभूषण, समाजकार्याची प्रचंड आवड असणारे सामाजिक कार्यकर्ते व समाजसेवक आणि आदर्श शिक्षक म्हणून ज्यांना आपण सर्वजण ओळखतो आणि गोताळा गावच्या विकासात ज्यांचा मोलाचा वाटा आहे. ज्यांनी गोताळा गाव विकसित गाव म्हणून देशाच्या नकाशावर सुवर्ण अक्षरांनी कोरले. ज्यांनी गोताळा गावातील दिन, दलीत, शोषित, पीडित, वंचित, उपेक्षित, कष्टकरी, कामगार, शेतकरी व शेतमजुरांच्या व्यथा वेळोवेळी शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी केले आहे. हे त्यांचे समाजाप्रती असणारे योगदान निदान मराठवाड्यातील सर्व जनसामान्यांना चांगले माहीत आहे. गणेशराव गुळवे गुरुजी एक आदर्श व उत्कृष्ट शिक्षक म्हणून आपला पेशा प्रामाणिकपणे सांभाळत समाजकार्य व समाज प्रबोधन करायचे. गोताळा गाव हे सुरुवातीपासूनच अविकसित आणि दुर्लक्षित गाव होते. या गावाचा विकास शून्य होता. गोताळा गाव लोकसंख्येच्या दृष्टीने असे काही खूप मोठे गाव नव्हते. आणि त्या गावात निरक्षर लोकांची संख्या अधिक होती. म्हणून त्या गावाकडे प्रशासनाचे लक्ष फार कमी असायचे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक दृष्टिकोनातून जर या गावाकडे पाहिले तर या गावात विकासाचा आलेख शून्य होता. या गावातील लोक बहुतांश शेतकरी व शेतमजूर होते. आणि निदान त्या काळात तरी उच्चशिक्षित व सर्व क्षेत्रांची पुरेपूर जाण असणारे एकमेव नेतृत्व व समाजसेवक म्हणजे गणेशराव गुळवे गुरुजी हे होते. या गावात पाण्याचा प्रश्न होता, रोडचा प्रश्न होता, लाईटचा प्रश्न होता, शिक्षणाचा प्रश्न होता, सरकारी दवाखान्याचा प्रश्न होता, शेतकऱ्यांसाठी पाझर तलाव आणि विहिरीचा प्रश्न होता. लोकांना राहण्यासाठी पक्के घरं नव्हती म्हणून घरकुलाचा देखील प्रश्न होता.परंतु या सर्व प्रश्नांना शासन दरबारी जाऊन जनतेच्या बाजूने प्रशासनाच्या विरोधात आवाज उठवण्याचे आणि वेळोवेळी प्रशासनाला निवेदन देऊन आपल्या गावात शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि गावकऱ्यांच्या सुखासाठी विविध योजना मंजूर करून त्या अंमलात आणण्याचे काम त्याच गोताळा गावचे भूमिपुत्र गणेशराव गुळवे गुरुजी यांनी केले आहे. गणेशराव गुळवे गुरुजी हे उच्चशिक्षित होते. त्यांचे वडील देखील शिक्षक होते. गणेशरावांना समाजकार्याची प्रचंड आवड होती. समाजकार्यात ते नेहमी अग्रेसर राहायचे. गोताळा गावचा विकास केवळ आणि केवळ गणेशराव गुळवे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे. हे कोणालाही नाकारता येणार नाही. गोताळा गावात गणेशराव गुळवे गुरुजी यांच्या एवढे शिक्षण कोणाचेच झाले नव्हते. गणेशराव सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक आणि समाजाचे तारणहार म्हणून ओळखले जातात. गुळवे सरांना सर्व क्षेत्राशी संबंधित परिपूर्ण अभ्यास होता. म्हणून प्रशासनातील अधिकारी देखील त्यांना घाबरायचे.कोणावर अन्याय झाला, कोण्या मुलीवर बलात्कार झाला, महिलेची छेडछाड काढली, कोणाला नाहक मारहाण केली, कोणी एखाद्या शेतकऱ्याच्या शेतावर जबरदस्तीने ताबा मिळवला. कोणी एखाद्याचे घर किंवा शेत लुटले तर पूर्ण गाव गणेशराव गुळवे यांच्याकडे समस्या मांडण्यासाठी यायचा. गणेशराव गुळवे गुरुजी उच्चशिक्षित असल्यामुळे आणि त्यांची प्रशासनावर जबरदस्त पकड असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली काढलेले मोर्चे, आंदोलने, उपोषणाला बसणे आणि वर्तमानपत्राच्या माध्यमातून शासनाला जाब विचारणे. गावकऱ्यांवर होत असलेला अन्याय अत्याचार वर्तमानपत्रात छापून यायचा. जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत गणेशराव तहसील समोर आमरण उपोषणाला ठिय्या मांडून बसायचे. भाषणातून व लेखनातून प्रशासनाला वेठीस धरायचे. त्यांना समाजकार्याची प्रचंड आवड आणि अन्यायाची प्रचंड चीड असायची. गणेशराव एक निर्भीड व अभ्यासू व्यक्तिमत्व आणि कर्तव्यदक्ष शिक्षक, समाजभूषण आणि समाजसेवक म्हणून केवळ जिल्हाभरच नव्हे तर पूर्ण राज्यभर चांगले ओळखले जाणारे चळवळीचे खंदे समर्थक होते. गुळवे सर कोणतेही काम निस्वार्थ भावनेने सामाजिक बांधिलकी म्हणून करायचे. गणेशराव शिक्षक तर होतेच पण साधेसुधे नाही. त्यांनी शिक्षकी पेशाची भूमिका बजावताना अतिशय शिस्तीने व जीव ओतून विद्यार्थ्यांना अध्यापन केले आहे. म्हणून ते विद्यार्थी प्रिय व आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. शाळेत वेळेवर येणे, जादा तासिका घेऊन शिकवणे आणि विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक बोधकथा सांगणे आणि त्यातून विद्यार्थी परिवर्तन करणे हे गुळवे सरांच्या शिकवणीचे वैशिष्ट्य होते. माझे गुरुवर्य बबन दामोदर गुळवे यांचे ते गुरु आहेत. गणेशरावांच्या अध्यापनाखाली व मार्गदर्शनाखाली बबन गुळवे शिकले आणि आज ते सुद्धा दुसरे गणेशराव म्हणूनच काम करतात. आपल्या कोणत्याही कामातून आपल्या गुरुचे नाव बदनाम होणार नाही याची पुरेपूर ते काळजी घेतात. बबन गुळवे सरांच्या प्रत्येक लेखात गणेशरावांचा उल्लेख असतोच. गणेशराव म्हणजे अर्ध्या रात्रीसुद्धा कामाला पडणारा एक निस्वार्थ व सामाजिक कार्याची प्रचंड आवड असणारा शिक्षक व समाजसेवक आहे. गणेशरावांच्या कार्याची पावती खूप मोठी आहे. ते जर इथे काढत बसलो तर लिखाण वाढत जाईल आणि तो बडेजावपणा वाटेल. नुकतेच गणेशराव गुळवे लिखित माझा आजन्म कारावास हे पुस्तक वाचून काढले. आणि हे पुस्तक त्यांनी कारागृहात असताना लिहिले आहे. गणेशराव गुळवे गुरुजी हे लिंगायत समाजाचे होते. ते




जातीपेक्षा व धर्मापेक्षा मानवतेला अधिक महत्त्व देत होते. कोणत्याही समाजाचा व्यक्ती त्यांच्याकडे समस्या घेऊन आला तर ते त्याचे निरसन करायचे. गरजू, दुःखी, पीडित व निराधार व्यक्तींना ते आर्थिक मदत करण्यात फार पुढे असायचे. परंतु मूळ विषय असा की, दलित समाजाचे सटवा कांबळे व त्यांची दोन मुले मोहन कांबळे व रावसाहेब कांबळे यांनी गोताळा गावात कोणावरही अन्याय अत्याचार म्हणजेच थोडक्यात हिटलरशाही सुरू केली. अख्खा गाव या तिघांना घाबरायचा. कारण ते कोणालाही मारायचे, आया बहिणींना अश्लील भाषेत बोलायचे, महिलांची अब्रू लुटायचे, कोणाचे घर फोडायचे, कोणाचे पशुधन पळवायचे, कोणाच्या शेतात जाऊन त्या पिकांचा सत्यानाश करायचे. म्हणजे पूर्ण गोताळा गाव सटवा कांबळे व त्यांच्या दोन मुलांना घाबरायचे. या तिघांना न घाबरणारा एकच माणूस होता तो म्हणजे गणेशराव गुळवे गुरुजी. आणि गोताळा गावातील गावकऱ्यांना माहीत होते की, आपल्याला एकच व्यक्ती न्याय देऊ शकतो तो म्हणजे गणेशराव गुळवे गुरुजी. म्हणून गावकरी रोज गणेशराव गुळवे गुरुजींकडे यायचे. समस्या मांडायचे, त्या तिघांनी केलेला अन्याय अत्याचार सांगायचे, आमचे जगणे मुश्किल केले आहे, आम्हाला या गावात राहणे मुश्किल झाले आहे. आता तुम्हीच काहीतरी तोडगा काढा आणि आम्हाला न्याय मिळवून द्या. यासाठी गणेशरावांनी कायदेशीर व सनदशीर मार्गाने आपण शासन दरबारी व तेही अहिंसात्मक मार्गाने लढा देऊ व न्याय मिळवू असा निर्वाणीचा सल्ला गावकऱ्यांना दिला. त्या तीन गुंडप्रवर्तीच्या नराधमांना अटक करण्यासाठी अनेक गुन्हे नोंद केले. पण पोलीस यंत्रणा गावकऱ्यांच्या बाजूने नसून त्या तीन नराधमांच्या बाजूने असायची.कारण हे तिघे पोलिसांना मुठीत धरून होते. पोलिसांना ते पैसा पाणी देऊन खुश करायचे. त्यांच्यावर एफ आय आर फाडायला देखील कोणी तयार नव्हते. हे तिघे मात्र मोकाट जनावरासारखे वागत होते. पोलीस प्रशासन यंत्रणा गावात यायची पण नुसती नावालाच...ना पंचनामा करायची ना आरोपीला अटक करायची... म्हणून त्या तीन गाव गुंडांना कोणतीच भीती वाटत नव्हती. कारण त्यांना पोलिसांचा पाठिंबा होता. त्या गोताळा गावात न्याय मिळवून देणारा आणि प्रशासनाला धडा शिकवणारा एकच धाडसी व जिगरबाज व्यक्ती आहे तो म्हणजे गणेशराव गुळवे गुरुजी हे गावकऱ्यांना माहीत होते. म्हणून गावकरी रोज गणेशरावांच्या घरी यायचे, तक्रारी घेऊन, गणेशराव गुळवे गुरुजी गांधीवादी विचारसरणीचे होते, ते अहिंसेच्या मार्गाने न्याय मिळवण्याचा प्रयत्न ते करत होते. परंतु त्यांनी अनेक मोर्चे काढले, पेपरबाजी केली, उपोषणाला बसले, एवढेच नाही तर पोलिसांना देखील जाब विचारू लागले. पोलीस यंत्रणा एवढी गप्प का? त्या तीन गावगुंडांनी पूर्ण गावात धुमाकूळ घातला आहे. महिला सुरक्षित नाहीत, शेतकरी सुरक्षित नाहीत, मुली सुरक्षित नाहीत आणि एकंदरीतच पूर्ण गाव त्यांच्या दहशतीखाली जगत आहे. आपल्याला अनेक वेळा कळवून सुद्धा आपण विचारपूस करायला गावात येत नाहीत. हा लोकशाहीचा अपमान नव्हे काय? तुमच्यासारख्या दलाल व निष्क्रिय पोलीस कर्मचाऱ्यांमुळे अन्याय अत्याचारात वाढ होत आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे गोताळा गाव आहे. असे गणेशरावांनी ठणकावून पोलीस प्रशासनाला सांगितले. तरीसुद्धा पोलीस काहीच दखल घेत नव्हते. गणेशरावांनी अनेक राजकीय लोकांना, प्रशासनातील मोठमोठ्या अधिकाऱ्यांना भेटी दिल्या, अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. गावकरी रोज त्या तीन गावगुंडाबद्दल तक्रारी घेऊन गणेशरावांकडे यायचे. सटवा कांबळे, मोहन कांबळे आणि रावसाहेब कांबळे हे तिघे गोताळा गावात एक प्रकारे हिटलर शाही आणू पाहत होते. हे तिघे पण बौद्ध समाजाचे होते. एकीकडे गुळवे गुरुजी कायदेशीर मार्गाने लढा लढत असतानाच दुसरीकडे पूर्ण गोताळा गाव एक झाले होते आणि सटवा कांबळे, मोहन कांबळे आणि रावसाहेब कांबळे या तिघांना ठार मारले. यालाच म्हणतात गोताळा हत्याकांड. हे हत्याकांड संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले. काही जणांनी याला जातीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. दलित विरुद्ध सवर्ण असा रंग देण्यात आला परंतु गणेशरावांना हे मान्य नव्हते.

ह्या हत्याकांडाबद्दल गणेशरावांनी ना पसंती व्यक्त केली. कारण ते गांधीवादी विचारसरणीचे होते. त्यांना रक्तरंजित क्रांती नको होती. ज्या पोलिसांना गणेशरावांनी कायदेशीर दाबले, त्यांना कायद्याचा धाक दाखवला आणि त्यांच्यावर एक प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केला ते पोलीस अधिकारी सुद्धा गणेशरावांवर प्रचंड रागात होते. या पोलिसांनी व त्या तीन मयत कुटुंबातील सदस्यांनी संगणमत करून या हत्याकांडाचे सूत्रधार गणेशराव गुळवे गुरुजी यांना ठरवले. गणेशरावांना जाणीवपूर्वक कटकारस्थान रचून त्यांच्यावर खोटे आरोप लावून त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात ६४ मारेकरी होते. केवळ एकाच जातीचे नव्हते तर संपूर्ण जातीचे लोक एकत्र येऊन त्यांना ठार मारण्याचा विडाच उचलला. गणेशराव गुळवे गुरुजींची चूक नसताना सुद्धा त्यांना मूळ सूत्रधार करून त्यांच्यावर मोठा गुन्हा दाखल करून कोर्टाने त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली. गणेशरावांची चूक नाही याची साक्ष पूर्ण गाव देत होता. हे हत्याकांड जेव्हा घडले तेव्हा गुळवे सर तिथे नव्हते. परंतु गुळवे सरांवर पोलीस यंत्रणा अगोदरच दात खाऊन होती. कारण गणेश रावांनी त्यांना चांगलेच झापले होते. भविष्यात गणेशराव गुळवे गुरुजी हे आपल्याला अडथळा ठरू शकतील आणि खूप मोठे समाज सुधारक व समाजसेवक होतील किंवा निस्वार्थ राजकारणी होतील या भीतीपोटी त्यांनी जाणीवपूर्वक गणेशरावांना आरोपीच्या पिंजऱ्यात ढकलले. गणेशरावांना १४ वर्षे कारावास भोगावा लागला. शेवटी सत्याचाच विजय होत असतो असे जे म्हटले जाते काहीसे तसेच गुळवे गुरुजींच्या बाबतीत घडले. असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कारण जनतेच्या न्यायालयात गुळवे गुरुजी आजही निर्दोष आहेत. म्हणूनच गोताळा गाव व परिसरातील माता भगिनी सहित सर्वांनी सरांना गोताळा भूषण पुरस्काराने जाहीर गौरवण्यात आले आहे. गोताळा हत्याकांड जर वाचायचे असेल तर गणेशराव कारावासात असताना माझा आजन्म कारावास हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. ते वाचताना वाचणारा वाचक थक्क होतो.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर**
**जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# सण,उत्सवांचे पावित्र्य जपा

आपल्या संस्कृतीमध्ये सण आणि उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्सव हा मानवी जीवनातील मरगळ झटकून, मनाला चैतन्य देणारा आणि समाज मनाला एकत्र जोडणारा असा एक महत्त्वाचा दुवा आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्रातील शक्तीची उपासना असणारा दुर्गोत्सव, हे दोन्ही सण महाराष्ट्रासह संपूर्ण भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे मुख्य स्तंभ आहेत. या उत्सवांचा मूळ उद्देश राष्ट्रजागृती, सामाजिक ऐक्य, कलागुणांना वाव आणि लोकप्रबोधन हाच होता,आणि आताही असायला हवा. परंतु, काळाच्या ओघात या पवित्र उत्सवांना व्यावसायिकता, स्पर्धा आणि पाश्चात्त्य विकृतीचे गालबोट लागले आहे. आज उत्सवांमध्ये घुमणारा डी.जे.चा कानठळ्या बसवणारा आवाज, अश्लील व बीभत्स गाणी आणि त्यावर होणारा अंगाचा थरकाप उडवणारा नाच यामुळे उत्सवाची सात्त्विकता धोक्यात आली आहे. ही परिस्थिती बदलून उत्सवांना पुन्हा एकदा त्यांचे मूळ, विधायक आणि कल्याणकारी स्वरूप देणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

गेल्या काही वर्षांत गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवातील विसर्जन मिरवणुकींचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पारंपारिक ढोल-ताशा पथके, लेझीम, आणि भजनांची जागा आता कर्कश्य आवाजाच्या डीजे () सिस्टीमने घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या ध्वनी मर्यादांची सर्रास पायमल्ली होताना दिसते. या डीजेवर वाजवली जाणारी गाणी कोणती असतात? तर चित्रपटगृहातही लाजवणारी, द्विअर्थी, आणि पूर्णपणे बीभत्स शब्द असणारी आयटम साँग्स. धार्मिक उत्सवांमध्ये अशा गाण्यांच्या तालावर तरुणाई ज्या प्रकारे अश्लील अंगविक्षेप करत नाचते, ते पाहून हे धार्मिक उत्सव आहेत की एखाद्या पबमधील गोंधळ, असा प्रश्न पडतो. सध्याचे हे अनेक ठिकाणी दिसणारे विदारक चित्र बदलायला हवे.

या आवाजाच्या प्रदूषणाचे गंभीर शारीरिक आणि मानसिक परिणाम समाजावर होत आहेत. मिरवणुकीतील अतिउच्च डेसिबलच्या आवाजामुळे वृद्ध नागरिक, लहान मुले, गरोदर महिला आणि आजारी व्यक्तींना त्रास असह्य होतो. दरवर्षी उत्सवाच्या काळात हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णालयात दाखल होणाऱ्या किंवा मृत्यूमुखी पडणाऱ्या नागरिकांच्या बातम्या आपण वाचतो. प्राण्यांना आणि पक्षांनाही या आवाजाचा प्रचंड त्रास होतो. केवळ वैयक्तिक आणि तात्पुरत्या आनंदासाठी




समाजातील एका मोठ्या घटकाच्या आरोग्याशी खेळणे, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. तसेच, अशा गर्दीत आणि बेधुंद वातावरणात महिलांची छेडछाड, अंमली पदार्थांचे सेवन आणि मंडळांमधील हाणामाऱ्या यांसारखे गुन्हेगारी प्रवृत्तीचे प्रकार वाढीस लागतात. ज्या उत्सवांनी समाजाला जोडायचे, तेच उत्सव आज समाजाला त्रासदायक ठरू लागले आहेत.

उत्सवांचे हे बिघडलेले स्वरूप बदलण्यासाठी केवळ कायदा किंवा पोलिसांवर विसंबून चालणार नाही, तर समाज म्हणून आपल्याला आत्मपरीक्षण करावे लागेल. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि तरुण पिढीने उत्सवाचे लोकमंगल स्वरूप ओळखून विधायक कार्यक्रमांची आखणी करणे गरजेचे आहे. उत्सव हा १० दिवसांचा किंवा ९ दिवसांचा आनंदोत्सव असला, तरी त्याचे परिणाम समाजावर वर्षभर टिकणारे असायला हवेत. यासाठी खालीलप्रमाणे रचनात्मक आणि विधायक उपक्रम राबवता येतील.परिवर्तनाची गरज आहे.

१. ध्वनी प्रदूषणाला फाटा आणि पारंपारिक कलांचे पुनरुज्जीवन.

मंडळांनी डीजेवर पूर्णपणे बंदी घालून लोककलेचे संवर्धन केले पाहिजे. महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा असलेली ढोल-ताशा पथके, लेझीम, गोंधळ, भारुड, पोवाडे आणि भजनांचे कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि तरुण पिढीला आपल्या खऱ्या संस्कृतीची ओळख होईल. पारंपारिक वाद्यांचा नाद मनाला आल्हाद देतो, तर डीजेचा आवाज केवळ शरीराला विद्रूपपणे हलवतो, हा फरक समजून घेतला पाहिजे.गेल्यावर्षी डी.जे.मुक्त गणेशोत्सव हि कल्पना भाऊसाहेब रंगारी मंडळाचे कार्यक्रम संयोजक पुनीत बालन ह्यांनी राबवली. पण त्याला पूर्णपणे प्रतिसाद मिळाला नाही.गावोगावी अशा प्रकारे डी.जे. मुक्त उत्सव कल्पना अमलात आणावी.

२. आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा उपक्रम.

उत्सवासाठी जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर केवळ भव्य देखावे आणि रोषणाईवर न करता, समाजोपयोगी कामांसाठी व्हावा. उत्सव काळात भव्य रक्तदान शिबिरे, मोफत डोळे आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत. अवयवदानासारख्या महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करावी. मंडळांनी आपल्या परिसरात फिरते दवाखाने किंवा आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यासाठी निधी द्यावा.

३. शैक्षणिक आणि वैचारिक प्रबोधन.

उत्सवांच्या मंचावरून अश्लील ऑर्केस्ट्रा आयोजित करण्याऐवजी व्याख्यानमालांचे आयोजन करावे. इतिहास, विज्ञान, उद्योग, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने व्हावीत. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका (लायब्ररी) सुरू करणे किंवा अनाथालयांना अन्नधान्य पुरवणे यांसारखे उपक्रम हाती घ्यावेत. आरतीच्या वेळी किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात अश्लील गाण्यांऐवजी स्तोत्रे, देशभक्तीपर गीते आणि सामाजिक संदेश देणारी नाटके,कार्यक्रम सादर करावीत.

४. पर्यावरणपूरक उत्सव (- ):

सध्याच्या काळात निसर्गाचे रक्षण करणे हे सर्वात मोठे पुण्य आहे. गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस () ऐवजी शाडूच्या, मातीच्या मूर्ती वापराव्यात. दुर्गोत्सवात रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींची स्थापना करावी. विसर्जन हे नदी, तलाव किंवा समुद्रात करून जलप्रदूषण करण्याऐवजी, पालिकेने तयार केलेल्या कृत्रिम टाक्यांमध्ये करावे आणि मूर्ती दान चळवळीला प्रोत्साहन द्यावे. उत्सव काळात निर्माल्य (फुले, हार) पाण्यात न टाकता, त्याचे योग्य विघटन करून सेंद्रिय खत बनवावे आणि ते शेतकऱ्यांना किंवा बागांना द्यावे.


५. स्वच्छता, शिस्त आणि अंमली पदार्थ विरोधी मोहीम.

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत प्रत्येक मंडळाने आपल्या परिसराची स्वच्छतेची जबाबदारी घेतली पाहिजे. प्लास्टिकमुक्त उत्सवाचा संकल्प करून कागदी (वर्तमानपत्रावर नाही.)किंवा केळीच्या पानावरील प्रसादाचे वाटप करावे. सणांच्या काळात तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथके आणि समुपदेशन केंद्र चालवावीत. उत्सव हा उत्साहाचा,आनंदाचा असावा, व्यसनाचा किंवा अविचाराचा नाही, हा संदेश घराघरात पोहोचवला पाहिजे.

ही सामूहिक जबाबदारी समजावी.

उत्सवांचे शुद्धीकरण करणे ही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा शासनाची जबाबदारी नाही, तर ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जोपर्यंत सामान्य नागरिक अश्लील गाणी आणि डी.जे वाजवणाऱ्या मंडळांवर जाहीर बहिष्कार टाकत नाहीत, तोपर्यंत हे चित्र बदलणार नाही. पालकांनीही आपल्या मुलांना अशा विकृत नाचापासून परावृत्त करून, त्यांना पारंपारिक आणि विधायक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.सामूहिक जबाबदारीचे भान प्रत्येकाने ठेवायला हवे.

गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव हे केवळ धार्मिक उत्सव नसून ते आपल्या सामाजिक आरोग्याचे आरसे आहेत. जेव्हा आपण उत्सवातील अश्लीलता, गोंगाट आणि डामडौल बाजूला सारून तिथं ज्ञान, सेवा, पर्यावरण रक्षण आणि सामाजिक सलोख्याची पेरणी करू, तेव्हाच या उत्सवांना खरे विधायक स्वरूप प्राप्त होईल. आपण सर्वांनी मिळून संकल्प करूया की, येणारे उत्सव हे कानठळ्या बसवणारे नसून मनाला तृप्त करणारे असतील; त्यात बीभत्सता नसेल तर पावित्र्य असेल. संस्कृतीचे रक्षण करूनच आपण एक सुदृढ, सुशिक्षित आणि प्रगतीशील समाज निर्माण करू शकू. हीच विघ्नहर्त्या,गजाननाची, गणरायाची आणि आदिशक्ती दुर्गेची खरी भक्ती ठरेल.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# टेंभुर्णी-जाफ्राबाद मार्गावर बेफाम वाहतुकीचा धुमाकूळ; आरटीओच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न

## गाव, चौक व फाट्यांवर वाहने वेग कमी करेनात; दुचाकीस्वारांचीही बेशिस्त वाहतूक वाढली; तरुणांची सुरक्षा समिती स्थापन करण्याची मागणी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

टेंभुर्णी (ता. जाफ्राबाद) गावातून तसेच जालना-सिंदखेडराजा मार्गावरून धावणाऱ्या दुचाकी, चारचाकी आणि मोठ्या वाहनांच्या बेफाम वेगामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. गावातील चौक, फाटे, वर्दळीची ठिकाणे तसेच शाळा-दवाखान्यांच्या परिसरातही अनेक वाहनचालक वेग कमी करीत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. कर्णकर्कश हॉर्न, वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणे आणि दुचाकीस्वारांकडून मनमानी पद्धतीने वाहने चालविण्याच्या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे.

या समस्येकडे जालना आरटीओ विभाग तसेच जिल्हा वाहतूक शाखेने गांभीर्याने लक्ष देऊन नियमित तपासणी व कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

**गावातील चौक, फाटे झाले धोकादायक**

टेंभुर्णी गावातून जाणाऱ्या प्रमुख मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. गावातील चौक, फाटे आणि वर्दळीच्या ठिकाणी वाहनांचा वेग कमी होणे अपेक्षित असताना अनेक दुचाकी, चारचाकी तसेच मोठी वाहने वेगातच पुढे जात असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.

विशेषतः मोठ्या ट्रक आणि इतर अवजड वाहनांमुळे परिस्थिती अधिक गंभीर होते. गावाच्या हद्दीत प्रवेश करताना वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी पुरेशा उपाययोजना नसल्याने पादचारी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण होतो. दुचाकीस्वारांकडूनही वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निर्धारित बाजूने वाहन चालविण्याऐवजी मनमानी पद्धतीने वाहने चालविणे, वेगाने ओव्हरटेक करणे तसेच हेल्मेट व इतर सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करण्याचे प्रकार वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**आरटीओ आणि वाहतूक शाखेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह**

वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर नियमित कारवाई करणे, वाहनचालकांचे परवाने तपासणे, वाहनांची कागदपत्रे आणि फिटनेस तपासणे यासाठी संबंधित यंत्रणांनी नियमित मोहीम राबविण्याची गरज आहे. मात्र, जाफ्राबाद-टेंभुर्णी मार्गावर अशी तपासणी पुरेशा प्रमाणात होत नसल्याने बेफाम वाहनचालकांचे मनोबल वाढत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. ''आरटीओ अधिकारी आणि जिल्हा वाहतूक शाखेचे अधिकारी-कर्मचारी नेमके कधी जागे होणार?'' असा सवालही नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

**एक स्वाक्षरीचे निवेदन; आंदोलनाचा इशारा**



या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी टेंभुर्णी ग्रामस्थांच्या वतीने आरटीओ अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना स्वाक्षरीचे निवेदन देण्यात येणार आहे. जालना-सिंदखेडराजा मार्गावर बेफाम धावणाऱ्या दुचाकी, चारचाकी व अवजड वाहनांसह कर्णकर्कश हॉर्नच्या त्रासाला आळा घालावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात येणार आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात येणार आहे.

**'तरुणांची सुरक्षा समिती' स्थापन करण्याची मागणी**

वाहतूक नियमांचे पालन आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी गावातील तरुणांचा सहभाग घेऊन 'तरुणांची सुरक्षा समिती' स्थापन करण्याची मागणी पुढे आली आहे.

या समितीच्या माध्यमातून गावातील धोकादायक ठिकाणांची माहिती प्रशासनाला देणे, वाहनचालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणे, शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणे तसेच अपघातप्रवण ठिकाणांची नोंद घेणे यासारखे उपक्रम राबविता येतील, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

**वाहनचालकांचे परवाने तपासण्याची गरज**

गावातून वर्दळीच्या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स, वाहनांची कागदपत्रे, फिटनेस, विमा आणि इतर आवश्यक बाबींची तपासणी करण्याची मागणी होत आहे. विशेषतः अल्पवयीन मुलांकडून वाहने चालविली जात आहेत का, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई होत आहे का, हेल्मेटचा वापर केला जातो का आणि वेगमर्यादेचे पालन होते का, याची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.

**'आरटीओचे दुर्लक्ष'**

जाफ्राबाद-टेंभुर्णी मार्गावर नियमित गस्त वाढविणे आणि वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक असताना आरटीओ विभागाकडून अपेक्षित पातळीवर कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जिल्हा वाहतूक शाखेनेही या मार्गावर नियमित तपासणी व गस्त वाढवावी, अशी मागणी आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाल्यास बेफाम वाहनचालकांना आळा बसू शकतो. त्यामुळे प्रशासनाने केवळ अपघात झाल्यानंतर कारवाई करण्याऐवजी अपघात होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे.

**सुरक्षिततेसाठी गतिरोधक, झेब्रा क्रॉसिंगची मागणी**

टेंभुर्णी गावातील प्रमुख चौक, वर्दळीची ठिकाणे आणि नागरिकांची सतत ये-जा असलेल्या भागात तातडीने स्पीड ब्रेकर आणि झेब्रा क्रॉसिंग उभारण्याची मागणी होत आहे. पोलीस प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करून आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारावेत. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना 'वाहन हळू चालवा', 'वेगमर्यादेचे पालन करा' असे दिशादर्शक व जनजागृतीपर फलक लावावेत, अशी मागणी आहे.

शाळा, महाविद्यालये आणि दवाखान्यांच्या परिसरात 'वाहने हळू चालवा', 'हॉर्न वाजवू नका' अशा सूचना देणारे फलक व बॅनर लावण्याचीही गरज आहे.

**प्रशासन अपघाताची वाट पाहणार का?**

रस्ते सुरक्षा ही केवळ पोलिसांची किंवा आरटीओची जबाबदारी नसून ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक शाखा आणि स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. टेंभुर्णीतील धोकादायक ठिकाणांची पाहणी करून तातडीने उपाययोजना न केल्यास भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ''एखादा मोठा अपघात घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा त्याआधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करा,'' अशी अपेक्षा ग्रामस्थ दत्ता देशमुख यांच्यासह नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# श्रीराम वाचनालय ही संस्कार देणारी शिदोरी; दुर्गेश कठोठीवाले

## संस्कृत स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव

**जालना । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला संस्कारांची जोड मिळणे आवश्यक आहे. ग्रंथसंग्रहालय श्रीराम वाचनालय हे केवळ पुस्तकांचे भांडार नसून विद्यार्थ्यांना संस्कार देणारी शिदोरी आहे. या ग्रंथालयात बालकांच्या बौद्धिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध विषयांवरील ग्रंथांचा खजिना उपलब्ध आहे, असे प्रतिपादन शिवसेना प्रतोद तथा नगरसेवक आणि जालना महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा, शिक्षण व विद्युत समितीचे सदस्य दुर्गेश कठोठीवाले यांनी केले.




श्रीराम संस्कृत विद्यालय (पाठशाळा), ग्रंथसंग्रहालय श्रीराम वाचनालय आणि अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी संस्कृत विषयाच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २१ ऑगस्ट २०२६ रोजी इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्पर्धांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास शिवसेना प्रतोद तथा नगरसेवक दुर्गेश कठोठीवाले, नगरसेवक सिद्धीविनायक मुळे, ॲड. राहुल चव्हाण आणि ग्रंथसंग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कल्याणी कुलकर्णी आणि पंडित सुधाकर वाहेगावकर यांनी जबाबदारी पार पाडली. दुर्गेश कठोठीवाले म्हणाले की, विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कार मिळणे गरजेचे आहे. संस्कृत स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण होते तसेच परीक्षेची तयारी करण्यासही मदत होते. वाचनालयातील ग्रंथसंपदा विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्याबरोबरच त्यांच्या विचारांना दिशा देण्याचे काम करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सिद्धीविनायक मुळे यांनी संस्कृत भाषेच्या अध्ययनाचे (पान २ वर)

# कचरा व्यवस्थापनात हलगर्जीपणा भोवणार; नियम न पाळल्यास वीज, पाणीपुरवठा खंडित होणार: सर्वोच्च न्यायालयाचा कडक इशारा

**जालना - प्रतिनिधी**

घनकचरा व्यवस्थापन ही केवळ सफाई कामगारांची मक्तेदारी नसून प्रत्येक नागरिक आणि आस्थापनेची ती घटनात्मक जबाबदारी आहे, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील कचरा व्यवस्थापनाबाबत अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन न करणाऱ्या मोठ्या कचरा उत्पादकांवर थेट पाणी आणि वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. न्यायमूर्ती एस. व्ही. एन. भाटी आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांना हे विशेष अधिकार बहाल केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेख समितीने सादर केलेल्या अहवालाची दखल घेत न्यायालयाने नमूद केले की, केवळ समित्या नेमून कचऱ्याचे ढीग कमी होणार नाहीत; यासाठी प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपापल्या भागातील मोठ्या कचरा उत्पादकांची यादी सहा आठवड्यांत तयार करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, तसेच शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमार्फत कचरा वर्गीकरणाची व्यापक जनजागृती घडवून आणावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

जालना महानगरपालिकेवर होणार थेट परिणाम सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाचा थेट प्रभाव जालना महानगरपालिका क्षेत्रावर पडणार आहे. जालना शहरातील हॉटेल्स, मंगल कार्यालये, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या कचरा उत्पादकांना आता सहा आठवड्यांच्या आत कचरा वर्गीकरण आणि विल्हेवाटीची स्वतंत्र यंत्रणा उभारणे बंधनकारक होणार आहे. जालना महापालिका प्रशासनाला अशा आस्थापनांची तात्काळ (पान २ वर)

# सुवर्णकार नगरात संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती उत्साहात

**जालना । प्रतिनिधी**

सोनार समाजाचे आराध्यदैवत आणि संत परंपरेतील थोर संत शिरोमणी संत नरहरी महाराज यांची जयंती २१ ऑगस्ट २०२६ रोजी सुवर्णकार नगर येथील गणपती मंदिरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त मंदिर परिसरात समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. विविध धार्मिक कार्यक्रम आणि संत नरहरी महाराजांच्या विचारांचे स्मरण करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत नरहरी महाराज हे महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील महत्त्वाचे संत मानले जातात. त्यांनी आपल्या आचरणातून भक्ती, कर्म, प्रामाणिकपणा, समता आणि सामाजिक एकोपा यांचा संदेश दिला. त्यांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण करत सोनार समाजाच्या बांधवांनी जयंतीनिमित्त एकत्र येत संत नरहरी महाराजांच्या विचारांचा जागर केला.

सुवर्णकार नगर येथील गणपती मंदिरात आयोजित कार्यक्रमामुळे परिसरात सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण होते. संत नरहरी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. उपस्थित समाजबांधवांनी संत नरहरी महाराजांना अभिवादन करत त्यांच्या कार्याचे स्मरण केले.

संत नरहरी महाराजांनी 'कर्म हाच धर्म' या भावनेतून जीवन जगत भक्ती आणि कर्तव्य यांचा सुंदर समन्वय साधला. त्यांच्या जीवनातील साधेपणा, श्रमप्रतिष्ठा आणि ईश्वरभक्ती आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

जयंती सोहळ्यास सोनार समाजातील अनेक मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि समाजबांधव उपस्थित होते. अमोल दुसाने, सुनील खर्डेकर (पान २ वर)

# चार घरफोडींचा फरार हिस्ट्रीशीटर जेरबंद; १.६७ लाखांचा मुद्देमाल जप्त

## सदर बाजार पोलिसांच्या डी.बी. पथकाची कारवाई; तलवार, कटर, ग्लायंडर व दोन मोटारसायकलीही ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चार घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये गुन्हा घडल्यापासून फरार असलेल्या हिस्ट्रीशीटर आरोपीला सदर बाजार पोलिसांच्या डी.बी. पथकाने शिताफीने ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून चोरीची मोटारसायकल तसेच घरफोडीसाठी वापरलेले साहित्य आणि अन्य दोन दुचाकी असा एकूण १ लाख ६७ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी करण्यात आली.



पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या आदेशानुसार सदर बाजार पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक आरोपींचा शोध आणि अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक भारती यांना माहिती मिळाली की, घरफोडीच्या गुन्ह्यात फरार असलेला हिस्ट्रीशीटर विजयसिंग कृष्णासिंग भादा (वय ४३, रा. वलीमामूदर्गा, जालना) हा वलीमामूदर्गा परिसरात फिरत आहे.

माहिती मिळताच डी.बी. पथकाला आरोपीला ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार व दोन पंच वलीमामूदर्गा परिसरात दाखल झाले.

दरम्यान, पोलिसांच्या हालचालींची चाहूल लागताच आरोपीने त्याच्या ताब्यातील लाल रंगाच्या मोटारसायकलवरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याचा पाठलाग करून काही अंतरावर शिताफीने त्याला ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपीविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात घरफोडीचे चार गुन्हे दाखल आहेत. गुन्हे दाखल झाल्यापासून तो फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात पुढील गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी (पान २ वर)

# खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या उपस्थितीत अंबडमध्ये काँग्रेसची आढावा बैठक

## स्थानिक समस्या आणि विकासकामांवर होणार चर्चा

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड शहर व तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक स्थितीचा तसेच स्थानिक प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी रविवार, २३ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक स्वामी समर्थ मंदिर हॉल, अंबड येथे होणार आहे.

अंबड शहर व तालुक्यात काँग्रेसची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच आगामी काळातील पक्षाच्या कामकाजाला दिशा देण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत अंबड शहर तसेच तालुक्यातील विविध गावांमधील नागरिकांच्या समस्या, विकासकामांशी संबंधित प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यात येणार आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपल्या



परिसरातील जनतेच्या समस्या बैठकीत मांडण्यासाठी सोबत आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार, शासकीय योजना तसेच विविध विकासकामांशी संबंधित प्रश्न बैठकीत मांडले जाण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवरील प्रश्न थेट खासदारांच्या निदर्शनास आणून देऊन त्यावर पाठपुरावा करण्याबाबतही चर्चा होणार आहे. बैठकीत काँग्रेसच्या शहर व तालुका पातळीवरील संघटनात्मक कामकाजाचाही आढावा घेण्यात येणार आहे. बूथनिहाय पक्षाची स्थिती, कार्यकर्त्यांची सक्रियता, नागरिकांशी संपर्क आणि आगामी काळातील पक्षविस्तार यावर पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे. आगामी राजकीय व स्थानिक निवडणुकांच्या (पान २ वर)

# एकल महिलांच्या सर्वेक्षणासाठी परतूर प्रशासनाची तातडीची कार्यवाही

**परतूर - प्रतिनिधी**

शासनाच्या निर्देशानुसार परतूर नगरपरिषद व शहर कार्यक्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण, नोंदणी व अद्ययावत माहिती संकलित करण्याच्या मागणीसाठी साऊ एकल समिती महाराष्ट्र राज्य, तसेच वैयक्तिक स्तरावर प्रा. सिद्धार्थ पानवले यांनी परतूर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय व नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदन सादर केले. या निवेदनाची प्रशासनाने तातडीने दखल घेत कार्यवाही सुरू केली आहे.

महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. २२ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकल महिलांसाठी धोरणाचा मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. त्यानंतर नगरविकास विभागाच्या दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्राद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.